महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
३, महापालिका मार्ग, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४००००१
Website: https://dvet.gov.in Email: daksh@dvet.gov.in दुरध्वनी क्र.: ०२२-२२६२०६०३/०२९३

क्रमांक:-१८/DAKSH/Tracer study & Skill Gap analysis/(२५८-४)/ ४८
दिनांक:- ०८/१०/२०२५

प्रति,
सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक, छ.संभाजीनगर,अमरावती,नागपुर.

विषय:- DAKSH: Support for Tracer Study and Skill Gap Analysis.
संदर्भ:- Ambarish Ambuj,Consultant, Education Global Practice, South Asia Region, The World Bank यांचा ईमेल दिनांक २९/९/२०२५.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील व्यावसायिक शिक्षण व कौशल्य वृद्धी आणि त्यासाठीच्या आवश्यक प्रायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी "मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास (Development of Applied Knowledge and Skills for Human Development - DAKSH)" प्रकल्प राबविण्यास दि. ०८/०६/२०२३ व २८/१२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्पातंर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे "Model ITI" मध्ये रुपांतर करण्याचे प्रस्तावित आहे.

DAKSH प्रकल्पातंर्गत जागतिक बँकेमार्फत नेमण्यात आलेल्या समितीकडून सोबत दिलेल्या ईमेल मधील शासकीय तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये प्रायोगिक तत्वावर Tracer Study and Skill Gap Analysis करण्यात येणार असल्याचे संदर्भाधिन ईमेल अन्वये कळविण्यात आलेले आहे.

तरी आपणास कळविण्यात येते की, जागतिक बँकेमार्फत नेमण्यात आलेल्या समितीस आवश्यक ते सहकार्य करण्याबाबत तसेच समितीस लागणारी माहिती विहीत नमुन्यामध्ये पुरविण्यातबाबत आपल्या अधिपत्याखालील संदर्भाधिन ईमेल मध्ये देण्यात आलेल्या शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना आवश्यक त्या सूचना आपल्या स्तरावरून निर्गमित करण्यात याव्यात.

(रमण फ. पाटील)
उपसंचालक

प्रत-१.उपसंचालक/प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण संस्था,(शासकीय व खाजगी) (ईमेल मधील) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी (प्रा.का. मार्फत).
२. Ambarish Ambuj,Consultant, Education Global Practice, South Asia Region, The World Bank यांना माहितीस्तव.